# दिनांक २३/०७/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ५) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/ पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | बडनेरा | ५९४/२२ कलम ३२४, ५०४ भा.दं.वि. | मारहाण करुन शिवीगाळ | -- | पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा | दि.२२.० ७.२०२२ चे १३.३० वा. | दि.२२.० ७.२०२२ चे १८.४७ वा. | शिवप्रसाद बुध्दुलाल ठाकुर वय- ७२ वर्ष रा. पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा | खिलावन शिवप्रसाद ठाकुर वय- ३५ वर्ष रा. पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा | मपोउपनी आठवले मॅंडम पोस्टे बडनेरा अमरावती शहर दि.२२.०७.२ ०२२ चे १८.४७ वा. ते १९.१५ वा. | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी व आरोपी हे नातेवाईक असुन एकाच मोहल्यात राहतात. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे घरी आले असता नमुद आरोपी हा घरी येवुन आरोपीने फिर्यादीस माझे घरात खायला काहीच नाही. मला पैसे द्या असे म्हटले असता फिर्यादीने आरोपीस तु तुझी कमाई दारुत उडवितो. मी तुला कुठुन पैसे देवु असे म्हटले तर आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करुन शिवीगाळ केली व घरात ठेवलेल्या लोखंडी पाईपने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीचे डोक्यावर मार लागला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी.सर्टि.वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २. | बडनेरा | ५९५/२०२२ कलम ३५४, ३५४(अ), ४५२, ५०४, ५०६ भादवि | घरात घुसुन विनयभंग करुन शीवीगाळ करुन धमकी | -- | अमरावती | दि.२२.० ७.२०२२ चे १०.३० वा. | दि.२२.० ७.२०२२ चे २१.२६ वा. | एक महीला | जितेंद्र अशोकराव सोळंकी रा. अमरावती | मपोउपनी आठवले मॅंडम पोस्टे बडनेरा अमरावती शहर दि.२२.०७.२ ०२२ चे २१.२६ वा. ते २२.१० वा.<br><br>तपासी अधिकारी - मपोउपनी आठवले मॅंडम पोस्टे बडनेरा अमरावती शहर | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व फि.चे नातेवाईक हे पोल्ट्री फार्म वर मजुरी चे काम करते. दि.२१.०७.२०२२ रोजी गावातील एक माणुस नामे जितेंद्र साहेबराव सोळंकी हा आला व फि.चे नातेवाईकाला मालकाबाबत विचारपुस करत होता. फि.चे नातेवाईकाने मालक हजर नाही असे सांगितले. वरुन तो माणुस निघुन गेला. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फि.चे नातेवाईक हे कोंबड्यांना दाना टाकुन दुकानात जातो असे म्हणुन निघुन गेले. तेवढ्यात नमुद आरोपी हा पुन्हा फार्म वर आला व फि.स विचारु लागला की, तुझा नातेवाईक घरी आहे काय तेव्ही मी त्याला सांगितले की, माझे नातेवाईक दुकानात गेले तुम्हाला काय काम आहे. असे विचारले असता त्याने मला म्हटले की, मला तुझ्याशीच काम आहे. असे म्हणुन त्याने फि.च्या खांद्याला पकडुन फि.ला जवळ ओढले. व फि.चे ओठाला किस करण्याचा प्रयत्न करु लागला फि.आरोपीला जोरात ढकलण्याचा प्रयत्न केला तेव्हा आरोपीने फिस घरातील पलंगावर जोरात ढकलेले आणि जोरात ओरडले की हट हट मला सोड तेवढ्यात फि.चे नातेवाईक पळत आले. व आरोपी ला पकडायला गेले असता आरोपी ने फि.चे नातेवाईकाला जोरात धक्का दिला व शिवीगाळ केली घडलेली घटना जर |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | कोणाला सांगितली तर मारुन टाकीन अशी धमकी दिली. व निघुन गेला. त्यानंतर फि.चे नातेवाईकाने मालकाला फोन वर घडलेली घटना सांगितली. मालक अमरावती मध्ये असल्याने मालक फार्मवर आल्यावर फि.ही नातेवाईकासह पोस्टेला रिपोर्ट द्यायला आली. अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ३. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | ८१२/२२ कलम ३७९ भादवि | चोरी करणे | फि ची मोपेड गाडी कि अं ३०,०००/- चि | अमरावती | दि २१-०७-२०२२ चे २०-०० वा ते २०-३० वा दरम्यान | २२-०७-२०२२ चे ००-३२ वा | एक महीला | अज्ञात इसम | -पोउपनि राजु जढाळे सा सा सोबत पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती दि -२२-०२-२०२२ चे ०१-०० वा ते ०१-३० वा दरम्यान | यातील नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांचे नातेवाईकाला ट्युशनला सोडणेकरीता गेले होते फिर्यादीची गाडी ज्युपीटर ब्राऊन रंगाची ज्याचा क्र एम एच २७ सी क्यु ७३४९ हि नमुद ठिकाणी लावली होती व फिर्यादी नातेवाईकाला ट्युशनला सोडुन अंदाजे ०८-३० वा संध्याकाळी परत आले व ठेवलेल्या ठिकाणी फिर्यादी यांची मोपेड गाडी हि मिळुन आली नाही आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही सदर गाडीचे इंजिन क्र सिजिएसए एल १४-९९७१ चेसिस न एमडी६२८सिजी५५ओल१ए११८३८ कि अं ३०,०००/- रु ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अश्या फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ४. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | ८१३/२२ कलम ३५४(ड) भादवि | विनयभंग करणे | ------ | अमरावती | दि २१-०७-२०२२ चे १२-३० वा दरम्यान | २२-०७-२०२२ चे ००-५९ वा | एक महीला | रोहीत बागडे रा अकोला | -पोउपनि राजु जढाळे सा सोबत पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती | यातील नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे नातेवाईक असुन यातील आरोपी याने त्याचा मो क्र  वरुन फिर्यादीचा मोबाईल क्र  वर कॉल करुन मैने तुम्हारे बर्थ डे के लिए गिफ्ट लिया है वौ लेने को तुम मुझे बाहर अकेले मे मिलने को आओ और मुझे तुमको कुछ बताना है असे म्हणुन आरोपी याने फिर्यादीला  फोनवर  आय लव्ह यु असे म्हणुन फिर्यादीच्या मनात लज्जा निर्माण होवुन विनयभंग केला. अश्या फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ५. | पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | ८१५/२२ कलम ३०२ भादवी | खुन | ------ | विदयाभारती मागासवर्गीय वसतीगृह पत्रकार कॉलनी अमरावती | दि २१-०७-२०२२ चे ०७-०० वा चे पुर्वी | २२-०७-२०२२ चे १७-३६ वा | नितेश उत्तम कोगे वय ३२ वर्षे रा जामली वन ता. चिखलदरा जि. अमरावती | रविंद्र पांडुरंगजी तिखाडे वय ५० वर्ष धंदा मागासवर्गीय विदयाभारती हॉस्टेलचे वार्डन रा शेगाव प्रियंका कॉलनी अमरावती | मा. श्रीमती आरती सिह पोलीस आयुक्त अमरावती श्री. मकानदार , पो.उपायुक्त परि.१, | यातील नमुद घब्टना ता. वेळी व ठीकाणी पो स्टे दि. २१.०७.२०२२ रोजी मर्ग क्र २७/२०२२ कलम १७४ जाफौ प्रमाणे दाखल असून मृतक हा वय १२ वर्षीय विदयार्थी असून मागासवर्गीय हॉस्टेलमध्ये राहत असून २१.०७.२०२२ रोजी अकस्मात मृत्यू झल्याने मृतकाचे पालकाने संशय दर्शविल्याने पो स्टे पोउपनि बापुराव खंडारे व पो स्टॉफ सोबत घेवून पी एम करणेकामी अकोला येथे गेले त्यावेळी पोउपनि खंडारे यांनी फी चे बयाण नोंदविले असता फीर्यादी यांनी बयाणात नमुद |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | आरोपी अटक नाही | श्रीमती पुनम पाटील, सहा.पो.आ. गा.नगर विभाग, वपोनि. श्री. अर्जुन ठोसरे, गुन्हेशाखा, श्री. आसाराम चोरमले, पो.नि. प्रविण वांगे, मपोनि. श्रीमती रेखा लोंढे, | केले. की, दि. २०.०७.२०२२ ला रात्री २०.०० वा मृतकाच्या वडीलांना मृतक नामे आदर्श निलेश कोगे वय १२ वर्ष याने फोन वर व्हीडीओ कॉल करुन सांगितले की, त्याचे हॉस्टेलचे मुलासोबत बाचाबाची झली त्यामुळे वार्डन याने मला मारहाण केले असे सांगितले. दि. २१.०७.२०२२ रोजी सकाळी ०९.३० वा दरम्यान फीर्यादीने व्हाटसअप पाहीले असता त्यामध्ये पापा मुझे मारा असे मॅसेज दिसले. गावातील झारखंडे यांनी फीर्यादीला सांगितले की, तुमचा मुलगा सिरीयस आहे. वरुन नातेवाईकांसह ईर्वीन दवाखाना वार्ड नं. ३० अपघात कक्ष आले असता मृतकाचे प्रेत बेडवर दिसले. फी चे नातेवाईकाने पाठीमागुन पाहीले असता पाठीवर पट्टे मारल्याचे लालसर व्रण दिसले त्याला हॉस्टेलमधील वार्डन नेच मारले आहे. वार्डननेच मारल्यामुळे मुलगा नामे आदर्श निलेश कोगे वय १२ वर्ष याचा मृत्यू झाला. अश्या फिर्यादीचे बयाणावरुन वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ६. | पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | ८१६/२२ कलम ३२४ भादवि | मारहाण करुन दुखापत | ------ | गजानन अपार्टमेट महर्षी शाळेजवळ अमरावती | दि २२-०७-२०२२ चे १५-०० वा दरम्यान | २२-०७-२०२२ चे १८-२८ वा | अमोल ज्ञानेश्वराव बनारसे वय ४० वर्षे रा. मुदलीयार नगर अमरावती | पवन लव्हाळे रा टाकरखेडा शंभु जि अमरावती | -मपोउपनि मनिषा सामटकर मॅडम सोबत पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती | यातील नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी याचे घराचे काम चालू असून इलेक्ट्रीक व प्लंबीक चे काम यातील आरोपीला फीर्यादी ने दिले होते परंतू आरोपीने फीर्यादीकडून नगदी ८५,०००/- रु व ३५,०००/- रु चा चेक घेतला व काम अर्धवट सोडून गेला फीर्यादी याने आरोपी यास चेक वापस मांगितला असता सदर आरोपीने फीर्यादीस मारहाण करुन जखमी केले. अश्या फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ७. | वलगाव | २३६/२०२२ कलम ३२४,५०४ भादवी | मारहाण करणे | - | ग्राम शिराळा , बौद्धपुरा | २०/०७/२०२२ चे १०/०० वा. | २२/०७/२०२२ चे १९/११ वा. | विरेन्द्र रमेशराव शिरसाठ वय ३४ वर्षे रा.शिराळा | अंकुश प्रल्हादराव सोनवणे वय २७ वर्षे रा.शिराळा | सपोनि सत्यवान भुयारकर सा. पोस्टे वलगाव अमरावती शहर दि.२२/०७/२०२२ चे १९/३० वा ते २०/०० वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील राहणारे असुन नमुद घटना. ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आपले घरी हजर असताना यातील आरोपी याने आपले घरी फिर्यादीला जेवन करण्यासाठी बोलावले असता यातील आरोपीने फिर्यादीस दारु पिणे करीता पैसे मागीतले असता फिर्यादी याने म्हटले की, माझेकडे पैसे नाही मी कोठुन देणार या कारणावरुन आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन लोखंडी पाईपने डाव्या हाताचे दंडावर ,उजवे खांद्यावर व दोन्ही मांड्यावर लोखंडी पाईपने मारहाण करुन जखमी केले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी. सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला . |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | राजापेठ | ६००/२२ कलम.४४८ ,५०६,३४ भा.द.वी. | गृह अतिक्रमण | -- | संतोषी माता मंदीर बालाजी प्लॉट, अमरावती. | दि.०१/०६ /२०२२ चे २०/०० वा ते दि.२२/० ७/२०२२ चे १७/०० वा. दरम्यान. | दि.२२/० ७/२०२२ चे २३/०६ वा. | किशोर देवादास चौधरी वय ७२ रा.संतोषी माता मंदीर बालाजी प्लॉट, अमरावती. | १)रविकांत उदयराज मोरे वय ५० २)रंजित गावंडे वय ४५ ३) एक महीला सर्व रा. अमरावती. | परि. पोउपनी. राहुल महाजन पो.स्टे. राजापेठ. अम. दि.२३/०७/२ ०२२ चे २३/१५ वा ते २३/३० वा | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील नमुद आरोपतांनी फिर्यादी यांचे राहते घरी त्यांची पुर्व परवानगी न घेता जबरीने घराचे कुलुप तोडुन प्रवेश करुन घराचा जबरीने ताबा घेतला व फिर्यादीची घरातील सामान बाहेर काढुन ठेवले त्या घरामध्ये दोन अज्ञात मुलीना ठेवण्यात आले व मला घरात येण्यास मज्जाव करुन धमक्या दिल्या. अयरर फि.चे लेखी रिपोर्ट व घराचे मालकीचे खरेदी व पि.आर.कार्ड वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ९. | राजापेठ | ६०१/२२ कलम. ४०६, ४२० भा.द.वी. | फसवणुक | -- | कंवर नगर, अमरावती. | दि.१३/० ४/२०२१ चे १६/०० ते दि.०९/० ७/२०२१ चे १०/०० वा पर्यंत. | दि.२२/० ७/२०२२ चे २३/४१ वा. | मनोज बलदेव झांबानी वय ४४ रा.कंवर नगर गल्ली नं.१ अमरावती. | महेन्द्र माली वय २८ रा.ह.मु. दुकान नं.८१ बुध्द नगर मावेक्रॉस रोड,मालाड(प) मुंबई रा.वापी गुजरात. | परि.पोउप नी.राहुल महाजन पो.स्टे. राजापेठ.अम. दि.२३/०७/२ ०२२ चे ००/०१ वा. ते ००/३० | हकीकत अशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी याचे मालकीचे मनोज ट्रेडर्स NX नावाचे तेलाचे होलसेल व्यापार आहे.त्यांची वरील नमुद आरोपी यांनी वेळोवेळी फिर्यादी कडुन खाद्य तेलाची उधारीवर खरेदी केली व फि.त्यांना देत गेले नंतर फि.ने आरोपीस ५५० बॉक्स वनस्पती बेकरी कि,अं.११,८०,०००/- रु ची उधारी दिली होती त्यामधुन आरोपीने ४०००००/- रु परत दिले नंतर परत ३५० बॉक्स वनस्पती बेकरी कि.अं.५,९९,००१/- व ३०० बॉक्स पाम तेल कि.अं.५,९३,९९९/- रु चा माल दिला.असा एकुण १९,८०,८७० रु चा मालाचे पैशाची फसवणुक केली. अशा फि.च्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| १०. | राजापेठ | ५९८/२२ कमल १६० भा.द.वी. | दंगल करणे | -- | करण बार समोर रोड वर हमालपुरा अमरावती. | दि.२२/० ७/२०२२ चे १४/३० ते १५/०० वा. दरम्यान. | दि.२२/० ७/२०२२ चे २०/४९ वा. | सर तर्फे परि.पोउपनी . राहुल महाजन पो.स्टे. राजापेठ. | १)भुषण राजेन्द्र वनारसे वय २४ रा.पन्नालाल नगर २)अक्षय विजयसिंग खोकड वय २८ रा.पुष्पराज कॉलनी, सातुर्णा अमरावती. | परीपोउपनि राहुल महाजन पोस्टे राजापेठ दि २२/७/२२ चे १४.४५ ते १६/०० वा | गुन्ह्याची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी हे सार्वजनीक ठिकाणी आपसात भांडण करुन झुंज करुन करीत असतांना मिळुन आले.अशा फि.चे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी विरुध्द गुन्हा कलम.१६० भा.द.वी. दाखल करुन तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११. | पो स्टे सिटी कोतवाली | ३६७/२०२२ कलम ३२४,५०४, ५०६ भादवी | दुखापत | - | कॉटन मार्केट विहिरी समोर, अमरावती | दि.२१/०७ /२०२२ चे २२.०० वा | दि.२२/० ७/२०२२ चे ०१.०५ वा | अब्दुल जमील वल्द अब्दुल कुंडुस, वय ४६ वर्ष, धंदा- भाजीपाला विक्री, रा.पॉरा डाईज कॉलनी, अमरावती | शेख जाकीर उर्फ जक्का वल्द शेख वजीर, वय ४० वर्ष, रा. हैदरपुरा, अमरावती | सपोनि राहुलकुमार राउत, रा. पो.स्टे.सिटी कोतवाली, अम.शहर, दि.२२.०७.२ ०२२ चे ०१.१५ वा ते ०१.३० वा | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी दि.२१.०७.२०२२ रोजी २२.०० वा दरम्यान कॉटन मार्केट मध्ये दुकानात भाजीपाला विक्री करित असतांना त्यांचे दुकाना जवळ वरिल आरोपी आला असता त्याचे अंगावर मागील भाजीपालाचे ६०००/-रु आहे. त्याने फिर्यादीला म्हटले की, सकाळी भाजीपाला का दिला नाही, या कारणावरुन शिवीगाळ केली व त्यानंतर भुक्यांनी मारहाण केली. फिर्यादी हा खाली पडला असता उजव्या पायाचे पंज्याच्या वरच्या भागाला लाथाने मारहाण केली. मार्केट मधील लोकांनी भांडण सोडविले असता आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली व तेथुन पळुन गेला.त्या दरम्यान माझे खिश्यात ८०००/-रु. ते १०,०००/- रु. भांडणा मध्ये पडले आहे. अशा जबाणि रिपोर्ट वरुन व मेडी. सर्टी वरुन व डि.ओ. यांचे शेरावरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| १२. | पो स्टे सिटी कोतवाली | ३६८/२०२२ कलम ३७९ भादवी | चोरी | सायकल हिरो कॉम्स कंपनीची निळ्या रंगाची फ्रेम क्र H१७७४ ५४ कि. ८,००० रु | मालवीस चौक तखतमल हॉयस्कुल जवळील वाहन प्रार्कींग परीसर अमरावती | दि.२२/० ७/२०२२ चे १४.३० वा | दि.२२/० ७/२०२२ चे १८.५९ वा | पवन रामेश्वर लाड, वय ४४ वर्ष रा गोपाल नगर अमरावती | अज्ञात | पोउपनि गुलतकर, रा. पो.स्टे.सिटी कोतवाली, अम.शहर, दि.२२.०७.२ ०२२ चे १९.०० वा ते १९.२० वा दरम्यान | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी चा मुलगा प्रेमराज पवन लाड हा तखतमल हॉयस्कुल वालकट कम्पाउन्ड येथ े वर्ग ११ वी चा प्रवेश प्रकीया समजावुन घेणे करीता स्वताचे सायकल हिरो कॉम्स कंपनीची निळ्या रंगाची फ्रेम क्र H१७७४५४ हि सायकल शाळेच्या वाहन प्रार्कींग परीसरामध्ये लॉक करुन उभी करुन ठेवली असता शाळेच्या मुख्य ईमारती मध्ये गेला व काही वेळानंतर परत आला असता त्याला त्याची सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही.आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली अशा जबाणि रिपोर्ट वरुन व डि.ओ. यांचे शेरावरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| १३. | खोलापुरी गेट | १९९/२०२२ कलम ३२४,३५२, ५०४,५०६, ३४ भादवी | दुखापत बाबत | - | महाजनपुरा अमरावती | २२/०७/२ ०२२ चे ००/२० वा सुमारास | २२/०७/ २०२२ चे ०२/४४ वाजता | योगेश रामेश्वर सावरकर वय २६ वर्ष रा. महाजनपुरा अमरावती | १) हरिष चंद्रकांत सावरकर वय २९ वर्ष २) युवराज चंद्रकांत सावरकर वय २७ वष दोंन्ही रा महाजनपुरा | पोहेकाँ संजय लोंदे ब.न.११५० पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर भेट ता वेळ २२/०७/२०२ २ चे ०४/०० | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आपल्या भावासह बाहेरुन घरी जात होता. मोहल्यात त्याचा चुलत भाउ हरिष चंद्रकांत सावरकर वय २७ वर्ष हा एका घराचे दारासमोर बसला असता फिर्यादी याने त्यास म्हटले की, तु येथे का बसला तु घरी चल असे म्हटले अता त्याने आईवर शिवी दिली फि.ने त्यास समजावित असता त्याने मला शिविगाळ केली व मारण्यास अंगावर येवुन मारण्याची धमकी दिली.तेंव्हा आरोपी क्रं.२ लहान भाउ युवराज चंद्रकांत याने फिर्यादी सोबत |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | अमरावती | वा ते ०५/०० वा पावेतो | वाद घालुन हातात दगड घेवुन फि.चे डोक्यावर मारला त्यामुळे फि.चे डोक्यावर उजव्या बाजुने जखमी झाला अशा फिर्यादीचे् जबानि रिपोट वरुन व मेडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>दाखल अधिकारी पोहेकाँ संजय लोंदे ब.न.११५० पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर |
| १४. | सायबर पोलीस स्टेशन | १८/२०२२ कलम ३५४ भा.द.वि. सहकलम ६६,६७(अ) माहिती तंत्रज्ञान कायदा | विनयभंग | निरंक | पार्वती नगर नं. ३ अमरावती | दि. १२/०७/२०२२ चे १५.०० वा. ते दि. २२/०७/२०२२ दरम्यान | दि. २२/०७/२०२२ चे १५.२० वा. | रिषभकुमार पवन भुतडा वय-२५ वर्ष,व्यवसाय - संशोधक रा. पार्वती नगर नं. ३ अमरावती | व्हास्टअप नं. +९१८१०६२३४५५२, +९४७६७६००८१७८२, +९१८८८००२५८१८, चा धारक | ---- | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता.वेळी फिर्यादीने फेसबुक पाहत असतांना एक ॲडवर क्लिक केले असता ते ॲप इन्ट्रॉल घेवुन परमिशन अलाऊ करुन मोबाईल मधील कॉन्टॅक्ट लिस्ट व इतर डाटा हॅक केला नंतर नमुद व्हास्टअप क्रमांकावर फिर्यादी व त्यांचे कॉन्टॅक्ट लिस्ट मधील लोकांना धमकीचे फोन कॉल्स व मॅसेजेस पाठविले जात असुन फिर्यादीचे नातेवाईकाचे आधार कार्ड व पॅन कार्डचे खाली अश्लील मजकुर लिहुन अश्लील फोटो पाठविले. अशा फि.चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. तपासी अधिकारी मो.नं. ९९२३६४७८९५ |

## दिनांक २३/०७/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग ६) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला/ मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | फ्रेजरपुरा | ४६६/२०२२ क १४२ बी पी अँक्ट | तडीपार आरोपी | निरंक | फ्रेजरपुरा अमरावती | दि २२.०७.२०२२ चे ०८.०० वा | दि २२.०७.२०२२ चे ११.०० वा | सपोउपनी संजय ओकांरराव वानखडे वय ५२ वर्ष ब न ९१ गुन्हे शाखा अमरावती | शक्ती प्रविण वाघमारे वय२६ वर्ष रा फ्रेजरपुरा अमरावती | भेट अधिकारी व तपास अधि -- पी अस आय विलास पोहळेकर पो स्टे फ्रेजरपुरा भेट वेळ दि २२.०७.२०२२ चे ११.३० वा ते १२.१५ वा | फिर्यादी हे पो स्टाँप सह गुन्हे शाखा अमरावती येथे आयुक्तालय हद्दीत गुन्हेगारी चेक व पेटोलिग करीत असतांना मिळालेल्या गोपनीय मागीतीवरुन नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी गेले असता एक इसम रेकाँर्ड वरील तडीपार आरोपी मिळुन आल्याने त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने नाव शक्ती प्रविण वाघमारे वय २६ वर्ष रा फ्रेजरपुरा अमरावती असे सांगुण त्याला अमरावती शहरात येण्या बाबत परवानगी बाबत विचारले असता त्याने उडवाउडवीचे उत्तर दिले नमुद आरोपी यास मा पो. उपआयुक्त साहेब परीमंडळ १ अमरावती याचे तळीपार आदेश क्र पो उप आ/ परीमंडळ१/तळीपार /२३७०/२०२१ दि३/०९/२०२१ अन्वये दोन वर्षा करीता अमरावती जिल्हातुन तळीपार |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | आदेश पारीत असतांना सुध्दा नमुद आरोपीतानां तळीपारचे उल्लघंन करुन शहरात फिरतांना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याची मेडीकल तपासनी करुन फुर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| २. | पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | ८१४/२२ कलम ५१(a)(b),६३ copy right Act सहकलम १०३,१०४ TM Act | कॉपीराईट | ------ | सखी ट्रेडर्स लक्ष्मी नगर अमरावती | दि २२-०७-२०२२ चे १४-०० वा दरम्यान | २२-०७-२०२२ चे १७-०६ वा | विजय उत्तमराव पवार वय ४२ वर्षे व्यवसाय खाजगी नोकरी रा. जुनी रमाबाई सहकार नगर घाटकोपर पुर्व मुंबई कन्सल्टंट इंडीया प्रायवेट लिमीटेड | घनश्याम हरीचंद्र लालवाणी वय ४० वर्ष रा. शोभा नगर अमरावती | -मपोउपनि मनिषा सामटकर मॅडम सोबत पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती दि २२-०७-२०२२ चे १७-१० वा ते १७-३४ वा वा दरम्यान | यातील नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील नमुद आरोपी ENO कंपनीचे पाउच विक्री करीत असताना ENO कंपनीचे प्रतिनिधी फिर्यादी व क्राईम चे अंमलदारांनी स्थानिक लक्ष्मी नगर येथील साक्षी कन्फेक्नंटी अँड ट्रेडर्स या आस्थापनेवर रेड केली असता बनावट ENO चे ४३२ बॉक्स जागेवर पकडले एका बॉक्स ची किंमत ५३२/- रु असुन एकुण किंमत २३३२८०/- रु आहे. अश्या फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ३. | राजापेठ | ५९७/२०२२ कलम २७९,५०४ भादवी | अपघात बाबत | - | मानसरोवर हॉटेल जवळ नवाथे नगर अमरावती | दि २२/०७/२२ चे १२/०० वा दरम्यान | दि २२/०७/२२ चे १५/१६ वा | मनीष रामनाथ तायडे वय ४५ रा. साई नगर अमरावती | टु व्हीलर क्र MH २७ BS ८१९६ चा चालक अमर जयराम भुसम वय २४ रा. छत्रसाल नगर अमरावती | परीपोउपनि राहुल महाजन पोस्टे राजापेठ दि २२/७/२२ चे १४.५० ते १५/०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याची मोटार सायकल क्रं MH २७ AP ०३२४नी साई नगर येथुन डयुटीवर एस.टि डेपो राजापेठ अम येथे जात असतांना नमुद घटनास्थळी फि च्या पायाला मोटार सायकल क्रं MH २७ BS ८१९६ च्या चालकाने भरधाव वेगाने गाडी चालवुन फि च्या गाडीला मागुन घडक दिली व त्या नंतर नमुद आरोपी याने फि सोबत वाद घालुन शिवीगाळ केली. अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

# दिनांक २३/०७/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (जुगार) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | फ्रेजरपुरा | ४६५/२०२२ कलम १२ (अ) म.जु.का. कायदा | जुगार | नगदी १९५०/- रु. व वरली मटक्याच्या चिठ्या व एक पेन १०/- रु. व एक एम आय कंपनीचा मोबाईल कि. ५०००/- रु. असा एकुण ६९६०/- रु.चा मुद्देमाल | ग्राम पोहरा येथील गजानन ठाकरे यांचे घरामागे हनुमान मंदिराजवळ खुल्या जागेवर | दि. २२/०७/२०२२ चे १४. २० वा. | दि. २२/०७/२०२२ चे १७.१६ वा. | सरतर्फे पोहेकॉ सुनिल सोळंके ब.नं. २८९ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | गजानन नारायण ठाकरे वय ३५ वर्ष रा. ग्राम पोहरा अमरावती | सरतर्फे पोहेकॉ सुनिल सोळंके ब.नं. २८९ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर दि. २२/०७/२०२२ चे १४. २० वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे डी बी पथकात कार्यरत असुन पेट्रोलींग दरम्यान गुप्त माहीती दाराकडुन माहीती मिळाली की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी एक ईसम वरली मटक्याचा जुगाराचा हार जित चा लोकांना चिठ्या देवुन पैसे घेवुन जुगार खेळ खेळवित आहे वरुन त्याचे वर जुगार रेड केली असा त्याचे जवळुन जप्ती पंचनाम्याप्रमाणे नगदी १९५०/- रु. व वरली मटक्याच्या चिठ्या व एक पेन १०/- रु. व एक एम आय कंपनीचा मोबाईल कि. ५०००/- रु. असा एकुण ६९६०/- रु. चा मुद्देमाल मिळुन आला अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २. | पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | ८१७/२२ कलम १२ अ मजुका | जुगार | तीन टाईम बाजार वरली मटका आकडे लिहीलेल्या १ ते १० आकडे व एक डॉट पेन किं अं १०/- रु तसेच नगदी ४८५०/- रु असा एकुण ४८६०/- रु चा माल | रमाबाई आंबेडकर नगर अमरावती | दि २२.०७.२०२२ चे १५.४२ वा | दि २२.०७.२०२२ चे १८.५३ वा | सरतर्फे पोहेकॉ इशय खांडे बन १२०५ पो स्टे गाडगे नगर अमरावती | निरंजन रमेश गळसुंदरे वय ३८ वर्ष रा तपोवन पंचशिला कॉलनी वानखडे यांचे घरी भाडयाने अमरावती | -मपोउपनि मनिषा सामटकर मॅडम सोबत पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती दि २२-०७-२०२२ चे १८-५५ वा ते १९-३० वा वा दरम्यान | यातील नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील पो. आयुक्त सा यांचे पथक व पो स्टै डी बी पथक यांनी दि २२.०७.२०२२ चे १५.०० वा रमाबाई आंबेडकर नगर या ठीकाणी प्रोव्ही. रेड केली असता यातील निरंजन रमेश गुळसुंदरे वय ३८ वर्ष याच्या ताब्यातून तीन टाईम बाजार वरली मटका आकडे लिहीलेल्या १ ते १० आकडे व एक डॉट पेन किं अं १०/- रु तसेच नगदी ४८५०/- रु असा एकुण ४८६०/- रु चा माल मिळून आला. अश्या फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | राजापेठ | ५९९/२२ कलम.१२ (अ) म.जु.का. | जुगार खेळणे | १)नगदी ३००/- २)डावावरील काही तास पत्ते कि.अं.००/- ३)०७ वेगवेगळ्या प्रकारची वाहने कि.अं.३,९०,०००/- असा एकुण३,९०,३००/- रु चा माल | बेलपुरा,शाळेचे इमारतीच्या व-हांड्यात शेड चे खाली, अमरावती. | दि.२२/०७/२०२२ चे १७/२७ वा. | दि.२७/०७/२०२२ चे २२/२२ वा. | सर तर्फे पो.हे.का. सागर सरदार ब.नं.१५८ पो.स्टे. राजापेठ. | १)चंदु आठवले २)सागर यादव ३)जप्त करण्यात आलेले वाहनाचे फरार मालक. | पो.हे.का. सागर सरदार परीपोउपनि राहुल महाजन पोस्टे राजापेठ दि.२२/०७/२०२२ चे १७/२७ ते १८/३० वा पर्यंत. | थोडक्यत हकीकत अशा प्रकारे आहे कि,यातील मिळालेल्या विश्वसनीय माहीती वर घटना ता. वेळी व ठीकाणी पंचा समज्ञ जुगार रेड केली असता रवाना होवुन सुलभ बेलपुरा शाळेच्या मैदान मध्ये गेला असता पोलीस येण्याची चाहुल लागताच गल्या बोळयाचा तसेच नजीक जवळ असलेल्या नाल्याचा फायदा घेवुन आम्हा पोलीसांना पाहुन पळुन गेला त्यामध्ये पो.स्टे.अभिलेखावर असलेला आरोपी नामे क्र.१)चंदु आठवले क्र.२)सागर यादव असे दिसुन आले सदर घटनास्थळावर जागार खेळण्याचे काही ताश पत्ते व नगदी चिल्लर ३००/- रु व जुगार खेळना-या इसमांचे दुचाकी वाहन १)पांढ-या रंगाची एक्टिवा क्र.एम.एच-२७-बिडी-४०४८ कि.अं.५०,०००/-२)स्पलेन्डर प्रो.क्र. एम.एच-२७- डिसी-८१६६ कि.अं.६०,०००/- ३)सिडी १०० एम.एच-२७-जे-६९५७ कि.अं. ४०,०००/-रु ४)एक्टिवा निळया रंगाची क्रएम.एच-२७-डिसी-६६९६ कि.अं.८०,०००/- ५)हिरो डिलक्स एम.एच-२७-एयु-७७९१ कि.अं.४०,०००/-६) होन्डा शाईन क्र.एम.एच-२७-सिटी.५६८७ कि.अं.७०,०००/-रु ७)होन्डा एक्टीवा क्र.एम.एच-२७-सीएम.-७७१८ कि.अं. ५०,०००/- असा मिळुन आल्याने सदर घटनास्थळावरुन पळुन गेलेले क्र.१ चंदु आठवले क्र.२)सागर यादव व सदर जप्त करण्यात आलेले वाहनाचे फारार झालेल्या मालकानवर कलम.१२(अ) म.जु.का.अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. |

# दिनांक २३/०७/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल प्रोव्हीशन) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | बडनेरा | ५९२/२२ कलम ६५ ई म.दा.का. | विनापरवाना दारु विक्री | ११ नग देशी दारु बाँबी संत्रा १८०MLच्या सिलबंद काचेच्या पावट्या कि.अं.६६०/- रु. | मिलचाळ नवी वस्ती बडनेरा | दि.२२.०७.२०२२ चे ११.०० वा. त | दि.२२.०७.२०२२ चे १७.३९ वा. | सरतर्फे NPC इरफान रायलीवाले ब.नं.१८७१ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | मनोज भिमराव भालेराव वय- ४३ वर्ष रा. मिलचाळ नवी वस्ती बडनेरा | पोउपनी उमेश मारोडकर सा. पोस्टे बडनेरा अमरावती शहर | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीद्वारे नमुद आरोपीवर पंचासमक्ष रेड केला असता त्याच्या ताब्यात ुन ११ नग देशी दारू बाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८०ml च्या सिलबंद पावट्या, कि. अं. ६६०/- रू. चा प्रो. माल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. सदर आरोपीचे कृत्य कलम ६५(ई) महा. दा. का. प्रमाणे गुन्हा होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| २. | बडनेरा | ५९३/२२ कलम ६५ ई म.दा.का. | विनापरवाना दारु विक्री | ११ नग देशी दारु बाँबी संत्रा १८०MLच्या सिलबंद काचेच्या पावट्या कि.अं. ६६०/- रु. | ग्राम पाळा ता. नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती | दि.२२.०७.२०२२ चे १२.०० वा. त | दि.२२.०७.२०२२ चे १७.५६ वा. | सरतर्फे NPC इरफान रायलीवाले ब.नं.१८७१ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | राजेश मांगीलाल सोळंके वय- २७ वर्ष रा. ग्राम पाळा ता. नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती | पोउपनी उमेश मारोडकर सा. पोस्टे बडनेरा अमरावती शहर | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीद्वारे नमुद आरोपीवर पंचासमक्ष रेड केला असता त्याच्या ताब्यात ुन ११ नग देशी दारू बाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८०ml च्या सिलबंद पावट्या, कि. अं. ६६०/- रू. चा प्रो. माल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. सदर आरोपीचे कृत्य कलम ६५(ई) महा. दा. का. प्रमाणे गुन्हा होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| ३. | खोलापुरी गेट | २००/२०२२ कलम ६५(ई) म.दा.का | अवैध दारु विक्री | देशी दारु बॉबी संत्रा च्या १८० मिली च्या ४८ पावट्या कि. ३३६० रु. | जकात नाक्याजवळ भातकुलीरोड अमरावती | २२/०७/२०२२ चे १८-४५ वा. | २२/०७/२०२२ चे २२-१३ वा. | पो. हे. कॉ. राजेश मोहनराव राठोड ब.नं. ११८५ गुन्हे शाखा अमरावती | छत्रपती कचरुजी बांबुरडे वय ६० वर्ष रा. संजयगांधी नगर अमरावती | पो. उप नि. आकाश महल्ले २२/०७/२०२२ चे २२-३० ते २३-१५ वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो. स्टॉफ सह आयुक्तालय हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या खात्रीलायक बातमी वरुन यातील नमुद आरोपी वर प्रो. रेड केला असता आरोपीच्या ताब्यातुन एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये एकुण ४८ नग देशी दारु बॉबी संत्राच्या १८० मीली च्या पावट्या कि. अं. ३३६० रु. चा प्रो. माल मिळुन आला तो पंचा समक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

**दिनांक २३/०७/२०२२ रोजी अकस्मात मृत्यू बाबतचा अहवाल. अमरावती शहर -**

| अ. क्र. | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय वर्ष | स्त्री/ पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ०९ | १० |
| | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

दिनांक 23/07/2022 व 24/07/2022 रोजीची शासकीय सुटटी असल्याने मा. सेशन कोर्टात होणा-या प्रकरणांची माहीती निंरक आहे.